M

# ठाण्यातील हरियाली संस्था म्हणजे 'नैसर्गिक प्राणवायूचा निर्मितीकार'

(श्री. वा. नेर्लेकर)

ठाण्याच्या हरियाली संस्थेने संस्थापक पुनम सिंगवी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या पंधरा वर्षांत हजारो हातांच्या मदतीने १ कोटीहून अधिक विविध वृक्षांच्या बिया जमिनीत रूजविण्याचे तर ५ लाखाहून अधिक झाडांच्या रोपांची लागवड करण्याचे जे रचनात्मक काम केलं त्याला खरोखरच तोड नाही. एक सर्वसाधारण झाड १८ व्यक्तींना ऑक्सीजन पुरविण्याचं काम करतं. साधारणत: एका झाडाच्या पन्नास वर्षांच्या कार्यकाळातून १३ लाख रुपयांचा प्राणवायू, २६ लाख रुपयांचं प्रदूषण नियंत्रण, १५ लाख रुपयांचं जलसंधारण व १३ लाख मृदसंधारणाचं कार्य घडतं असं त्यातील तज्ञांचं मत आहे. या पार्श्वभूमीवर विचार केल्यास हरियाली संस्थेचं काम इतकं मौल्यवान आहे की 'नैसर्गिक प्राणवायूचा निर्मितीकार' या शब्दातच त्यांचं वर्णन करावं लागेल. मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे, जलसंवर्धन करणे आणि पर्यावरणविषयक जनजागृती करणे या तीन प्रमुख उद्देशाने हरियाली संस्थेची स्थापना झाली होती. तिन्ही उद्देश सफल करण्यात संस्था यशस्वी झाली असे म्हणावे लागेल.

संस्थेने पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन यासाठी स्वत:ची जबाबदारी ओळखून सामाजिक भावनेने रचनात्मक काम केल्यामुळे ते प्रचंड प्रमाणावर यशस्वी झाले असे म्हणता येईल.

फळे खाऊन झाली की त्याच्या बिया कुठेही फेकून देणे हा सार्वत्रिक अनुभव. त्यापासून निर्माण होणारा कचरा व दुर्गंधीमुळे पर्यावरणाची हानी हा तर चिंतेचा विषय. या कचऱ्याचे व्यवस्थापन व त्यासाठी करावा लागणारा भरमसाठ खर्च ही तर डोकेदुखीच. पुनम सिंगवी यांनी सर्वावर उतारा म्हणून लोकांना बिया फेकून न देता त्या साठवून संस्थेला देण्याचे आवाहन केले. या आवाहनातून लाखो बिया जमा झाल्या. आणि त्या वाळवून त्यातून 'महाबीज रूजवाई'ची संकल्पना अंमलात आली. गेल्या पंधरा वर्षांत या संकल्पनेतून येऊरचा डोंगर, कोकणीपाडा, बाळकूम-माजीवडा पाईपलाईन, आयआयटी पवई, मुंब्र्याचा डोंगर, काल्हेर-कशेळी, भांडुप-मुलुंड पाईपलाईन, नाशिक महामार्गावरील दिंडेश्वर, भवाळे-लेनाडचा परिसर, सासवड ते फलटण मार्ग आदी अनेक ठिकाणी हजारो हातांच्या मदतीने १ कोटीहून अधिक विविध वृक्षांच्या बिया जमिनीत रूजविण्यात आल्या. वड, पिंपळ, उंबर, करंज, गुलमोहर, चिंच, बहावा, जांभूळ, शाल्मली, आपटा, विलायती चिंच, बांबु, खैर, झेंडु, आंबा, पेरू, चिक्कू, सिताफळ, फणस, पपई, तेरडा, केवडा, सुबाभूळ, चाफा आदी अनेक २० ते २५ प्रकारच्या वृक्षांच्या बियांचा त्यात समावेश आहे. जमिनीमध्ये टाकलेल्या बियांपैकी सर्वसाधारणपणे ७५ टक्क्यांची उगवण होऊन ती चांगली तरारली आहेत. जेथे माणसांचा हस्तक्षेप व गुरांचा उपद्रव अधिक आहे अशा ठिकाणी बिजा रूजून रोपे तरारण्याचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. हा अपवाद सोडल्यास महाबीजारोपण उपक्रमास चांगले यश मिळाल्याचे दिसून येईल. महाबीजारोपण उपक्रमाबरोबरच वृक्षलागवडीच्या प्रकल्पातही ती मोठी होऊन जीवंत राहण्याचे प्रमाण ७० ते ७५ टक्के आहे.

ठाण्यापासून २५ कि.मी. अंतरावर असलेल्या भवाळे-लोनाड डोंगराला हिरवाईने नटवण्याचा प्रकल्प हा संस्थेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प समजला जात आहे. वनविभागाने सात वर्षांच्या कराराने संस्थेला हा २५ एकराचा परिसर हिरवाईसाठी दिला आहे. गेल्या तीन वर्षात २५ हजार रोपांची लागवड या ठिकाणी करण्यात आली असून २५ हजार



दुर्मिळ वृक्षांच्या बिया येथील जमिनीमध्ये रूजविण्यात यश मिळाले आहे. तेथील रोपे छान डवरली असून ४ मोठे तलाव, १८ चेकडॅम (वनराई बंधारे) आणि समांतर पातळीवरील ८०० चर (खंदक) निर्माण झाल्यामुळे जलसंवर्धनाच्या कामाला चांगला उठाव मिळाला आहे. डोंगरावरून धो-धो वाहत येणारे पाणी अक्षरश: वाया जात होते. त्यामुळे मातीची धूपही मोठ्या प्रमाणावर होत असे. आता या तलावात, चेकडॅम व समांतर पातळीवर चरांमध्ये पाण्याचा मुबलक साठा उपलब्ध होत असून प्रामुख्याने जमिनीत पाणी मुरण्याची प्रक्रिया जोरात आहे. येऊरच्या डोंगरमाथ्याला तसेच भवाळे-लोनाड डोंगरमाथ्याला लाभलेल्या हिरवाईमुळे डोंगराचा आता अक्षरश: कायापालट झाला असून त्याचा चेहरामोहरा बदलला आहे. येऊरच्या डोंगरातील नैसर्गिक घळी, खाचखळगे आणि खोलगट भाग यांचा उपयोग करून संस्थेने तेथे निर्माण केलेले पाच जलाशयांचे साठे तेथील हिरवळ वाढविण्यासाठी, मस्त्यनिर्मितीसाठी, पक्ष्यांना आकृष्ट करण्यासाठी आणि वन्य पशु-पक्ष्यांना पिण्यासाठी उपयोगी पडत आहेत. भवाळे-लोनाड येथील प्रकल्प म्हणजे तेथील शहरांच्या दृष्टीने फुफ्फुसे ठरतील अशी लक्षणे दिसत आहेत.

हरियालीच्या या वृक्षलागवड आणि जलसंधारण प्रकल्पाला हजारो हातांची लाभलेली निरपेक्ष मदत ही संस्थेच्या दृष्टीने मोठी जमेची बाजू म्हणावी लागेल. ५० कॉलेजेसमधील सुमारे २५ हजार विद्यार्थी, नॅशनल सोशल सर्व्हिसेसची मुले-मुली, शिक्षक, विविध संस्थांचे सदस्य आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या कामासाठी सक्रीय सहभाग दिला.

M





सासवड ते फलटण मार्गावर पंढरीच्या आषाढी वारीच्या निमित्ताने वारकऱ्यांनी बिया रूजविण्यासाठी केलेली मदत मोलाची ठरली आहे.

हरियाली संस्थेने श्रमदानाच्या माध्यमातून गेल्या पंधरा वर्षात अल्पखर्चात आणि सामाजिक जाणीवेच्या भूमिकेतून पर्यावरण रक्षणाचे केलेले रचनात्मक काम इतके मौल्यवान आहे की भावी पिढ्यांसाठी ते जीवनदायी ठरणार आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

## हिरवाईचा जीवनदायी कायापालट

गेल्या पंधरा वर्षांतील कामाची भरारी आणि त्याचं मिळालेलं फलित अक्षरश: थक्क करणारं आहे. उघडे-बोडके पडलेले डोंगर आज हिरवाईने नटलेले दिसत आहेत. हिरव्यागार झाडाझुडपांची रेलचेल, नैसर्गिक पाण्याचा साठा, रंगीबेरंगी फुलझाडे आणि फळझाडांनी सुगंधित झालेले वातावरण, पशु-पक्ष्यांचा वावर, फुलपाखरांचं बागडणं, रातकिड्यांचे आवाज यामुळे या डोंगरांना टवटवीतपणा प्राप्त झाला आहे. उतरणीवरील मातीची धूप थांबली असून जमिनीत पाणी मुरण्याची प्रक्रिया सतेज झाली आहे. उन्हाच्या चटक्यांनी तापलेल्या तेथील वातावरणाला शीतलता प्राप्त झाली आहे. गंभीर झालेल्या रुग्णाला अतिदक्षता विभागात ठेवल्यावर ऑक्सीजन लावावा लागतो. तेव्हा आपल्याला ऑक्सीजनची खरी किंमत कळते. या पार्श्वभूमीवर हरियाली संस्थेने नैसर्गिक ऑक्सीजन शुद्ध स्वरुपात देणारी जीवनदायी झाडे लावून अनमोल काम केले आहे.



## नाविन्यपूर्ण प्रयोगामुळे समस्यांवर मात

भवाळे-लोनाड परिसरात काम करताना संस्थेने गरजेतून समस्यांवर कशी मात केली हे पाहण्यासारखे आहे. प्लॅस्टीकच्या रिकाम्या बाटल्या कचऱ्यात फेकून न देता त्या पाण्याने भरून डोंगरावर ठेवल्या तर - ही अभिनव कल्पना सूचताच त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात आली. येत्या दोन महिन्यांत येथे पाण्याने भरलेल्या अशा बाटल्यांची संख्या २० हजारावर जाणार आहे. हेच पाणी एप्रिल-मे महिन्यात रोपांना जीवंत ठेवण्यासाठी उपयोगी पडणार आहे. शिवाय २० हजार रिकाम्या बाटल्या कचऱ्यात फेकल्यामुळे प्रदूषणाचा प्रादुर्भाव होऊन पर्यावरणाची होणारी हानीही त्याचमुळे टळली आहे. मातीचे बांध वाहून जाऊ नयेत म्हणून दगड लावावे लागतात. त्यासाठी ५० हजाराचा खर्च येणार होता. दगडाऐवजी खराब व निकामी झालेले ज्यूटचे गालीचे वापरले तर - ही अभिनव कल्पना सूचल्यावर त्याचीही लगेच अंमलबजावणी करण्यात आली. तेथे आता दगडाऐवजी खराब झालेल्या ज्यूटचे ८००० चौ.फुटाचे गालिचे लावल्यामुळे काम तर चोख झाले शिवाय त्यामुळे खर्चही वाचला. एरवी खराब ज्यूटचे गालिचे खाडीत डंप करण्यात येत असत. तेथील प्रदूषण त्यामुळे वाढत असे. तेही यामुळे टळले आहे. ठाण्यातील कृष्ण स्टोअर्सने आपल्याकडील गालिचे संस्थेला देऊन या उपक्रमाला सहाय्य केले.

